भारतीय रिज़र्व बैंक
RESERVE BANK OF INDIA
www.rbi.org.in

आरबीआय/२०१३-१४/९३
डीबीओडी.एएमएल.बीसी.क्र. २३/१४.०८.००१/२०१३-१४ जुलै ०१, २०१३
आषाढ १०, १९३५ (शक)

सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांचे (आरआरबी सोडून)
अध्यक्ष/मुख्य कार्यकारी अधिकारी

**महोदय - बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ च्या कलम ३६(१) खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० च्या तरतुदींची अंमलबजावणी**

फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ - भारतामधील संघ/संघटनांद्वारे विदेशी कँाट्रिब्युशनच्या स्वीकारामधील बँकांचे दायित्व, ह्यावरील बँकांना दिल्या गेलेल्या सूचना/मार्गदर्शक तत्वे एकत्रित केलेल्या आमचे महापरिपत्रक डीबीओडी.एएमएल.बीसी.क्र. १२/१४.०८.००१/२०१२-१३ दि. जुलै २, २०१२ चा कृपया संदर्भ घ्यावा.

(२) फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० आणि फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) नियम, २०११ जारी करण्यात आल्याने, फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६ रद्दबातल झाला आहे.

(३) ह्या महापरिपत्रकात फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० आणि फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) नियम, २०११ वरील, रिझर्व बँकेने जून ३०, २०१३ पर्यंत दिलेली मार्गदर्शक तत्वे एकत्रित करण्यात आली आहेत.

(४) हे महापरिपत्रक, रिझर्व बँकेच्या वेबसाईटवरही (http://www.rbi.org.in) टाकण्यात आले आहे.

आपला
(प्रकाश चंद्र साहू)
मुख्य महाव्यवस्थापक.

बँक व्यवहार आणि विकास विभाग, सेंट्रल कार्यालय, सीओ. बिल्डिंग, १३ वा मजला, फोर्ट, मुंबई – ४००००१ टेलिफोन क्र :०२२-२२६०१००० / फॅक्स क्र. ०२२-२२७०१२३९ ईमेल आयडी : cgmicdbodco@rbi.org.in

**फॉरिन कॅान्ट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० च्या तरतुदींच्या अंमलबजावणीवरील महापरिपत्रक**


| | |
|---|---|
| १ | सर्वसाधारण |
| २ | मार्गदर्शक तत्वे |
| ३ | एफसीआरए २०१० ची प्रमुख लक्षणे |
| ३.१ | प्रस्तावना |
| ३.२ | विदेशी वर्गणीच्या स्वीकारावरील मनाई |
| ३.३ | विदेशी पाहुणचार स्वीकारण्यावरील निर्बंध |
| ३.५ | विदेशी वर्गणीचा स्वीकार करण्यासाठी पंजीकरण |
| ३.६ | विदेशी वर्गणीचा स्वीकार, हस्तांतरण, उपयोग इत्यादींवरील मनाई व निर्बंध |
| ३.७ | अनुसूचित बँकेमार्फत मिळविण्याची विदेशी वर्गणी |
| ३.८ | लेखा ठेवणे व ॲसेट्सची वासलात |
| ३.९ | तपासणी व जप्त करण्याचे अधिकार |
| ३.१० | संकीर्ण प्रश्न |
| ४ | ह्या अधिनियमाखाली तयार केलेले नियम व बँकांद्वारे अहवाल पाठविणे |

**(१) सर्वसाधारण**

**(१.१)** भारत सरकारच्या गृहमंत्रालयाने, अधिकृत राजपत्रात, अधिसूचना एस.ओ.९०९ (ई) दि. २९ एप्रिल २०११ प्रसिध्द केली असून, तिच्या अन्वये, मे १, २०११ पासून, फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० (हा अधिनियम) जारी करण्यात आला आहे. राजपत्रित अधिसूचना जीएसआर ३४९ (ई) दि. एप्रिल २९, २०११ अन्वये, फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) नियम, २०११ अधिसूचित करण्यात आले आहेत. हे नियम, ह्या अधिनियमाबरोबरच जारी करण्यात आले आहेत. हा अधिनियम जारी झाल्याने, फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, १९७६, रद्दबातल झाला आहे. ह्यासाठी बँकांनी खात्री करुन घ्यावी की, ह्या नवीन अधिनियमामधील तरतुदी व आणि त्याखाली केलेले नियम ह्यांचे संपूर्ण पालने केले जात आहे. त्यानुसार, जनहिताचा विचार करुन आणि तसे करणे आवश्यक असण्याबाबत समाधान झाल्याने, रिझर्व बँकेने, बँकिंग रेग्युलेशन अधिनियम, १९४९ (१९४९ चा १०) च्या कलम ३६ च्या पोट कलम (१) मधील खंड (अ) अन्वये तिला दिलेल्या अधिकारांचा आणि ह्याबाबत तिला साह्य करणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, सर्व अनुसूचित वाणिज्य बँकांद्वारे (प्रादेशिक ग्रामीण बँका सोडून) पालन करण्यासाठी, फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० आणि फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) नियम, २०११ वरील मार्गदर्शन दिले.

**(१.२)** ह्या अधिनियमाची मुख्य लक्षणे खाली दिली आहेत. ह्या महापरिपत्रकाचा उद्देश, ह्या अधिनियमानुसार व त्याखाली केलेल्या नियमांना अनुसरुन असलेली दायित्वे पूर्ण करण्याबाबत बँकांसाठी मार्गदर्शन करणे एवढाच आहे. एखादी शंका उद्‌भवल्यास, बँकांनी हा अधिनियम व त्याखाली केलेले नियम ह्यामधील मजकुराचा संदर्भ घ्यावा आणि आवश्यक वाटल्यास कायदेशीर सल्ला घ्यावा.

**(२) मार्गदर्शक तत्वे**

**(२.१)** फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१०, जनतेच्या विशिष्ट वर्गाला, विदेशी वर्गणी स्वीकारण्यास मनाई करतो. त्याचप्रमाणे, हा अधिनियम, व्यक्तींच्या विशिष्ट वर्गाला, केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेतल्या शिवाय, भारताबाहेरील कोणत्याही देशाला किंवा प्रदेशाला भेट देतेवेळी विदेशी पाहुणचार स्वीकारण्यास मनाई करतो. ह्या अधिनियमानुसार, निश्चित असे सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक व सामाजिक कार्यक्रम ठेवणा-या व्यक्तींनी, कोणतीही विदेशी वर्गणी चा स्वीकार करण्यापूर्वी, भारत सरकारकडे स्वतःची नोंदणी/पंजीकरण केले पाहिजे. वरील वर्गामधील एखाद्या व्यक्तीने केंद्र सरकारकडे नोंदणी केलेली नसल्यास, ती व्यक्ती केवळ केंद्र सरकारकडे नोंदणी केल्यानंतरच विदेशी वर्गणी स्वीकारु शकेल. ह्याशिवाय ह्या अधिनियमाखाली, ह्या अधिनियमामध्ये विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला विदेशी वर्गणी स्वीकारण्यास मनाई करण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे, आणि त्यात विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्तींच्या वर्गाला, विदेशी वर्गणी स्वीकारण्यापूर्वी केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेण्यासाठी सांगण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे.

**(२.२)** विदेशी वर्गणी स्वीकारण्यासंबंधाने, ह्या अधिनियमाने बँकांवर काही दायित्वे टाकलेली आहेत. ह्या अधिनियमातील अटीनुसार, नोंदणीकृत/पूर्व परवानगीधारक अशी प्रत्येक व्यक्ती, तिने स्वीकारलेली विदेशी वर्गणी, केवळ एकाच खात्यामध्ये व त्याने/तिने अर्जात विहित केलेल्या बँकेच्या शाखांमार्फतच जमा करील. अशा खात्यांमध्ये इतर कोणत्याही प्रकारचा निधी (विदेशी वर्गणी सोडून) जमा करण्यास सक्त मनाई आहे. ह्या अधिनियमानुसार, अपरिहार्यपणे, प्रत्येक बँकेने किंवा विदेशी मुद्रा व्यवहारातील प्राधिकृत व्यक्तीने, विहित केलेल्या विदेशी प्रेषणाची रक्कम, ज्या प्रकाराने ते विदेशी प्रेषण मिळाले त्याचा स्त्रोत व रीत आणि इतर माहिती, विहित केलेल्या स्वरुपात आणि रितीने विहित केलेल्या प्राधिकरणाला कळवावी. ह्या अधिनियमाच्या कलम १८ नुसार, ह्या अधिनियमाखाली पंजीकरण प्रमाणपत्र मिळालेल्या किंवा पूर्व परवानगी मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीने, ह्या अधिनियमात विहित केलेल्या तपशीलानुसार व रितीने केंद्र सरकारला माहिती पुरविली पाहिजे. ह्या माहितीसोबत, मिळालेल्या विदेशी वर्गणीचा तपशील असलेल्या विवरणपत्राची (बँकेच्या प्राधिकृत अधिका-याने किंवा विदेशी मुद्रेतील प्राधिकृत व्यक्तीने प्रमाणित केलेली) एक प्रत जोडली जावी.

**(२.३)** फॉरिन कँाट्रिब्युशन (विनियम) अधिनियम, १९७६ च्या कलम ६ खाली, पंजीकरण प्रमाणपत्र किंवा पूर्व परवानगी मिळाली असलेल्या संस्था ह्या अधिनियमाखाली विदेशी वर्गणी मिळविण्यासाठी पात्र असणे सुरुच राहील, आणि असे पंजीकरण, हा अधिनियम जारी होण्याच्या तारखेपासून पाच वर्षांच्या कालावधीसाठी वैध असेल. रद्दबातल केलेल्या अधिनियमाच्या कलम ९ खाली विदेशी पाहुणचार स्वीकारण्याची दिलेली परवानगी ही, केंद्र सरकारने ती परवानगी काढून घेईपर्यंत, ह्याच अधिनियमाखाली दिल्याचे समजले जाईल.

**(२.४)** ह्या फॉरिन कँाट्रिब्युशन (विनियम) अधिनियम, १९७६ खाली, रिझर्व बँक, वेळोवेळी बँकांना मार्गदर्शक तत्वे देत आहे की, व्यक्तींच्या खात्यांमध्ये जमा करण्यासाठी विदेशी वर्गणी स्वीकारतेवेळी खात्री करुन घेण्यात यावी की, संबंधित व्यक्ती/संस्थांचे, केंद्र सरकारकडे पंजीकरण झालेले आहे किंवा कायद्याने आवश्यक असल्यास, अशी वर्गणी स्वीकारण्याबाबत त्यांनी पूर्व परवानगी मिळवलेली आहे आणि केवळ विहित केलेली शाखा सोडून अन्य कोणतीही शाखा, त्या विदेशी वर्गणीचा स्वीकार करणार नाही. अशा वर्गण्यांच्या स्वीकारांसंबंधीचा अहवाल केंद्र सरकारकडे सादर करण्याबाबतही बँकांना सांगण्यात आले होते. रद्द केलेल्या अधिनियमाच्या अंमलबजावणीमध्ये विहित केलेल्या कार्यरीतींपासून काही अनियमितता व च्युति नजरेस आल्या होत्या. विदेशी वर्गण्यांचा स्वीकार करण्याबाबत, ह्या नवीन अधिनियमांच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यास बँका व वित्तीय संस्थांना सांगण्यात येत आहे.

### ३. एफसीआरए २०१० ची प्रमुख लक्षणे

#### (३.१) प्रस्तावना

प्रास्ताविकात स्पष्ट केल्याप्रमाणेच, फॉरिन कँाट्रिब्युशन (रेग्युलेशन) अधिनियम, २०१० चे उद्दिष्ट म्हणजे, काही विशिष्ट व्यक्ती किंवा संस्था किंवा कंपन्यांद्वारे विदेशी वर्गणी किंवा विदेशी पाहुणचाराचा स्वीकार व वापर ह्यांचे विनियमन करणारे कायदे एकत्रित करणे, आणि राष्ट्रीय हित व त्यासंबंधाने असलेल्या बाबींसाठी मारक असलेल्या कोणत्याही कार्यकृतींसाठी विदेशी वर्गणी किंवा अतिथ्याचा स्वीकार किंवा वापर करण्यास मनाई करणे हा होय. हा अधिनियम, संपूर्ण भारताला, त्याच्या विदेशातील नागरिकांना, तसेच भारतात पंजीकृत किंवा सुसंस्थापित झालेल्या कंपन्यांच्या, भारताबाहेरील सहाय्यक शाखा किंवा दुय्यम कंपन्यांनाही लागू आहे.

#### (३.२) विदेशी वर्गणीच्या स्वीकारावरील मनाई

ह्या अधिनियमाच्या अटीनुसार, काही विशिष्ट व्यक्तींना, विदेशी वर्गणी घेण्याबाबत संपूर्ण मनाई आहे. ह्या अधिनियमाच्या कलम २ च्या खंड (ह) मध्ये दिल्याप्रमाणे, विदेशी वर्गणी ह्या संज्ञेची व्याख्या म्हणजे, एखाद्या विदेशातील स्त्रोताने, कोणतीही वस्तु (वैय्यक्तिक वापरासाठी, विहिते केलेल्या मूल्यापेक्षा अधिक बाजार मूल्य नसलेली व देणगी म्हणून दिलेली वस्तु सोडून), चलन (भारतीय किंवा विदेशी) किंवा कोणतीही प्रतिभूती, ह्यांची देणगी/दान. विदेशी वर्गणी स्वीकारण्यास मनाई असलेल्या व्यक्ती पुढील प्रमाणे आहेत :

(अ) निवडणुकीसाठीचा उमेदवार ;

(ब) नोंदणीकृत वृत्तपत्राचा बातमीदार, स्तंभ लेखक, व्यंगचित्रकार, संपादक, मालक, मुद्रक किंवा प्रकाशक ;

(क) सरकारद्वारा नियंत्रित किंवा सरकारी मालकीच्या कोणत्याही संस्थेचा न्यायाधीश, सरकारी नोकर किंवा कर्मचारी ;

(ड) विधानसभेचा सभासद ;

(ई) राजकीय पक्ष किंवा त्यांचे पदाधिकारी ;

(फ) विहित केल्यानुसार असलेल्या राजकीय स्वरुपाच्या संस्था ;

(ग) कोणत्याही इलेक्ट्रॉनिक रितीद्वारे किंवा स्वरुपात किंवा सार्वजनिक दळणवळणामार्फत, श्राव्य बातम्या किंवा दृक् श्राव्य बातम्या किंवा विद्यमान बाबी ह्यांचे कार्यक्रम निर्माण किंवा ब्रॉडकास्ट करणा-या कंपन्या किंवा संघ ;

(ह) वरील (ग) मध्ये संदर्भित संघ/संस्था किंवा कंपन्यांचे वार्ताहर, किंवा स्तंभ लेखक, व्यंगचित्रकार, संपादक किंवा मालक.

ह्या अधिनियमानुसार, काही विशिष्ट संस्थांना, राजकीय स्वरुपाच्या संस्था म्हणून, अधिकृत राजपत्रात प्रसिध्दी देण्याचा अधिकार केंद्र सरकारला देण्यात आला आहे. तथापि, पुढील विशिष्ट प्रकरणांमध्ये उपरिनिर्दिष्ट व्यक्ती विदेशी वर्गणीचा स्वीकार करु शकतात :

(अ) कोणत्याही विदेशी स्त्रोतामधून किंवा त्या विदेशी स्त्रोताने भारतामध्ये सर्वसामान्यपणे केलेल्या व्यवसायाबाबत, वेतन, पगार किंवा अन्य मोबादल्याच्या स्वरुपात केलेले प्रदान; किंवा

(ब) त्याने आंतरराष्ट्रीय व्यापार किंवा वाणिज्य ह्यासाठी किंवा त्याने भारताबाहेर सर्वसामान्यपणे केलेल्या व्यवसायाबाबत केलेल्या प्रदानाच्या स्वरुपात;

(क) त्या विदेशी स्त्रोताने केंद्र सरकार किंवा राज्य सरकार ह्यांच्याशी केलेल्या व्यवहाराबाबत त्या विदेशी स्त्रोताचा प्रतिनिधी म्हणून; किंवा

(ड) भारतीय प्रतिनिधी-मंडळाचा एक सदस्य म्हणून त्याला दिल्या गेलेल्या देणगीच्या किंवा बक्षिसाच्या स्वरुपात - मात्र, अशी देणगी किंवा बक्षिस, त्याने, असे बक्षिस किंवा देणगी स्वीकारण्याबाबत/ठेवण्याबाबत, केंद्र सरकारने केलेल्या नियमांनुसारच असले पाहिजे; किंवा

(ई) त्याच्या नातेवाईकाकडून; किंवा

(फ) विदेशी मुद्रा व्यवस्थापन अधिनियम १९९९ खाली, कोणतीही अधिकृत वाहिनी, पोस्ट ऑफिस, किंवा विदेशी मुद्रा व्यवसायातील कोणतीही प्राधिकृत व्यक्ती ह्यांच्या मार्फत, सर्वसामान्य व्यवसायादरम्यान मिळालेले प्रेषण; किंवा

(ग) एखादी शिष्यवृत्ती, भत्ता, किंवा त्या स्वरुपाचे कोणतेही प्रदान.

विदेशी वर्गणी ह्या संज्ञेची व्याप्ती समजण्यासाठी, ह्या अधिनियमानुसार केलेल्या विदेशी वर्गणी च्या व्याख्येचा अर्थ समजणे आवश्यक आहे. ह्या संज्ञेला, खूप मोठी व्याप्ती असलेली समावेशक/अंतर्भूत व्याख्या देण्यात आली आहे. सर्वसाधारणतः त्यामध्ये, विदेशी सरकारे व त्यांचे प्रतिनिधी, कोणत्याही आंतरराष्ट्रीय एजन्सीज्, (युनायटेड नेशन्स, वर्ल्ड बँक ह्यासारख्या विहित केलेल्या एजन्सीज सोडून), विदेशी नागरिक, विदेशी कंपन्या व निगम, ट्रेड युनियन्स, ट्रस्ट, सोसायट्या, क्लब्स ह्यासारख्या भारताबाहेर स्थापित किंवा पंजीकृत झालेल्या संस्था इत्यांदीचा समावेश आहे.

### (३.३) विदेशी पाहुणचार स्वीकारण्यावरील निर्बंध

काही विशिष्ट अशा विहित व्यक्तींवर ह्या अधिनियमाद्वारे विदेशी पाहुणचार स्वीकारण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत. त्यानुसार वैधानिक करण्यात आले आहे की, कायदे मंडळाचा सभासद किंवा एखाद्या राजकीय पक्षाचा पदाधिकारी, किंवा न्यायाधीश किंवा सरकारी कर्मचारी किंवा सरकारद्वारा नियंत्रित केलेल्या किंवा मालकीच्या कोणत्याही निगमाचा किंवा संस्थेचा कर्मचारी, भारताबाहेरील कोणत्याही देशाला किंवा प्रदेशाला दिलेल्या भेटीदरम्यान, भारत सरकारची पूर्व परवानगी घेतल्याशिवाय कोणत्याही विदेशी आतिथ्याचा स्वीकार करणार नाही. तथापि, भारताबाहेर दिलेल्या भेटीदरम्यान,

आकस्मिक आजारामुळे घ्याव्या लागणा-या तातडीच्या वैद्यकीय औषधोपचारांबाबत अशी परवानगी घेणे आवश्यक नाही. विदेशी पाहुणचार ह्या संज्ञेची व्याख्या म्हणजे, एखाद्या विदेशी स्त्रोताकडून, कोणत्याही विदेशात किंवा परप्रदेशात जाण्याचा खर्च दिला जाणे किंवा निःशुल्क असे राहणे, जेवणे, जाणे-येणे किंवा वैद्यकीय उपचार केले जाणे इत्यादि किंवा केवळ प्रासंगिक नसलेला खर्च रोख किंवा अन्य प्रकारे दिला जाणे.

**(३.४)** ह्याशिवाय, ह्या अधिनियमात विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला कोणत्या विदेशी वर्गणीचा स्वीकार करण्याची मनाई करण्याचा, आणि ह्या अधिनियमात विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा व्यक्ती-वर्गाला, केंद्र सरकारची पूर्व-परवानगी मिळविल्याशिवाय कोणत्याही विदेशी पाहुणचाराचा स्वीकार करण्याची मनाई करण्याचा अधिकार ह्या अधिनियमाने केंद्र सरकारला दिला आहे.

**(३.५) विदेशी वर्गणीचा स्वीकार करण्यासाठी पंजीकरण**

ह्या अधिनियमाच्या कलम ११ अन्वये वैधानिक करण्यात आले आहे की, ह्या अधिनियमात अन्यथा विहित केलेले सोडून, निश्चित असा सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक, धार्मिक किंवा सामाजिक कार्यक्रम नसलेली व्यक्ती, केंद्र सरकारकडून पंजीकरण प्रमाणपत्र मिळविल्याशिवाय विदेशी वर्गणीचा स्वीकार करु शकणार नाही. वरील वर्गात असलेली व्यक्ती केंद्र सरकारकडे पंजीकृत झालेली नसल्यास, ती व्यक्ती, केवळ केंद्र सरकारची पूर्व परवानगी मिळविल्यानंतरच विदेशी वर्गणी स्वीकारु शकेल. केंद्र सरकार त्याच्या अधिकृत राजपत्रात एक अधिसूचना जाहीर करुन, विदेशी वर्गणी स्वीकारण्यापूर्वी पूर्व परवानगी घेणे आवश्यक असलेली व्यक्ती किंवा व्यक्तींचा वर्ग, अशी वर्गणी स्वीकारवयाचे क्षेत्र, ती वर्गणी वापरण्याचा हेतु आणि जेथून स्वीकार करावयाचा आहे ते विदेशी स्त्रोत ही माहिती विहित करील. असे देऊ केलेले पंजीकरण निलंबित किंवा रद्द करण्याचा अधिकारही केंद्र सरकारला देण्यात आला आहे. कलम १२ खाली असे प्रमाणपत्र दिले गेलेल्या प्रत्येक व्यक्तीने, त्या प्रमाणपत्राचा कालावधी संपण्यापूर्वी ६ महिन्यांच्या आत त्याचे नूतनीकरण करणे आवश्यक आहे.

**(३.६) विदेशी वर्गणीचा स्वीकार, हस्तांतरण, उपयोग इत्यादींवरील मनाई व निर्बंध**

३.६.१ पंजीकृत आणि प्रमाणपत्र देण्यात आलेल्या व्यक्ती किंवा ह्या अधिनियमाखाली पूर्व-परवानगी दिल्या गेलेल्या व्यक्ती. ह्यांच्यावर, अन्य व्यक्ती पंजीकृत व प्रमाणपत्र मिळालेली नसल्यास किंवा अशा अन्य व्यक्तीने ह्या अधिनियमाखाली तशी पूर्व-परवानगी घेतलेली नसल्यास, अशा विदेशी वर्गणीचे हस्तांतरण त्या अन्य व्यक्तींना करण्यास मनाई आहे. मिळालेल्या विदेशी वर्गणीच्या उपयोगावर निर्बंध घालण्यात आले असून, ह्या अधिनियमानुसार वैधानिक करण्यात आले आहे की, त्या विदेशी वर्गणीचा उपयोग, ती वर्गणी ज्यासाठी मिळाली होती त्याच हेतुसाठी केला जावा. कोणत्याही विदेशी वर्गणीचा किंवा त्याद्वारे निर्माण झालेल्या उत्पन्नाचा उपयोग सट्ट्यासाठी केला जाऊ शकणार नाही. ह्या अधिनियमाद्वारे, विदेशी वर्गणीचा उपयोग प्रशासकीय खर्च भागविण्यासाठी केला जाण्यावर निर्बंध घालण्यात आले आहेत.

**३.६.२** हा अधिनियम, केंद्र सरकारला, कलम ३ मध्ये विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला विदेशी वर्गणी स्वीकारण्यास मनाई करण्याचा अधिकार प्रदान करतो आणि कलम ६ मध्ये विहित न केलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा संस्थेला, अशा प्रकारचा विदेशी पाहुणचार घेण्यापूर्वी केंद्र सरकारची पूर्व परवानगी घेणे आवश्यक करतो. एखाद्या व्यक्ती च्या ताब्यात किंवा नियंत्रणाखाली त्या व्यक्तीने ह्या अधिनियमाच्या कोणत्याही तरतुदीचे उल्लंघन केलेली, भारतीय किंवा विदेशी एखादी वस्तु, किंवा मुद्रा प्रतिभूती स्वीकारली आहे काय ह्याबाबत केलेल्या चौकशीने केंद्र सरकारचे तसे समाधान झाले असल्यास, लिखित आदेशाने, त्या व्यक्तीला, अशी वस्तु, मुद्रा किंवा प्रतिभूतीचे प्रदान, पोहचविणे, हस्तांतरण करणे किंवा अन्य कोणत्याही प्रकारे व्यवहार करणे ह्यावर, केंद्र सरकारचा त्याबबत नेमका लेखी आदेश मिळल्याशइवाय, मनाई घालण्यात आली आहे.

### ३.७ अनुसूचित बँकेमार्फत मिळविण्याची विदेशी वर्गणी

कलम १७ हे बँकर्ससाठी विशेष महत्वाचे आहे. त्याच्या अनुसार, कलम १२ खाली प्रमाणपत्र मिळालेल्या किंवा पूर्व-परवानगी दिली गेलेल्या प्रत्येक व्यक्तीला, त्या व्यक्तीने, प्रमाणपत्र मिळविण्यासाठी तिने केलेल्या अर्जात, विदेशी वर्गणी मिळविण्यासाठी, त्या बँकेच्या ज्या शाखेचे नाव दिले असेल, त्याच शाखेतील केवळ एकाच खात्यामधून ती विदेशी वर्गणी मिळविता येईल. त्या व्यक्तीला मिळालेल्या विदेशी वर्गणीचा विनियोग करण्यासाठी, ती व्यक्ती, एका किंवा अनेक बँकांमध्ये एक किंवा अधिक खाती उघडू शकते. तथापि, अशा खात्यांमध्ये, विदेशी वर्गणी सोडून अन्य कोणताही निधी मिळविता किंवा जमा करता येणार नाही. ह्या अधिनियमाद्वारे वैधानिक करण्यात आले आहे की, प्रत्येक बँकेने किंवा विदेशी मुद्रेतील प्राधिकृत व्यक्तीने, विहित केलेल्या प्राधिकरणाला, विहित केलेल्या स्वरुपात व रीतीने, पुढील गोष्टी कळवाव्यात (अ) विदेशी प्रेषणाची विहित रक्कम (ब) त्या विदेशी प्रेषणाचा स्त्रोत व मिळण्याची रीत आणि (क) इतर तपशील.

ह्या अधिनियमाखाली प्रमाणपत्र किंवा पूर्व मंजुरी मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीने, विहित केलेल्या कालावधीत व रीतीने, केंद्र सरकारला किंवा केंद्र सरकारने विहित केलेल्या प्राधिकरणाला, पुढील बाबी कळविणे आवश्यक आहे त्या व्यक्तीला मिळालेली विदेशी वर्गणी, ती मिळण्याचा स्त्रोत व रीत, वर्गणी ज्यासाठी मिळाली तो उद्देश व त्याने त्या वर्गणीचा उपयोग केल्याची रीत. ह्याशिवाय, विदेशी वर्गणी मिळविणा-या प्रत्येक व्यक्तीने एक विवरणपत्र देऊन त्यात त्या बँकेच्या अधिका-याने किंवा विदेशी मुद्रेतील प्राधिकृत व्यक्तीने प्रमाणित केलेला, मिळालेल्या विदेशी वर्गणीचा तपशील द्यावा आणि ते विवरणपत्र केंद्र सरकारकडे सादर करावे.

### ३.८ लेखा ठेवणे व ॲसेट्सची वासलात

ह्या अधिनियमाच्या कलम १९ अन्वये वैधानिक करण्यात आले आहे की, वरीलप्रमाणे प्रमाणपत्र मिळालेल्या किंवा पूर्व-मंजुरी मिळालेल्या प्रत्येक व्यक्तीने, विहित केलेल्या रितीने, मिळालेली विदेशी वर्गणी व तिचा विनियोग ह्याची लेखा ठेवणे आवश्यक आहे. ह्या अधिनियमाखाली विदेशी वर्गणी स्वीकारण्यास परवानगी दिलेली व्यक्ती जीवित नसल्याच्या किंवा अस्तित्वात नसल्याच्या प्रसंगी, ती व्यक्ती, त्यावेळी जारी असलेल्या ज्या कायद्याखाली पंजीकृत किंवा सुसंस्थापित झाली होती, त्या कायद्यामधील तरतुदीनुसार, त्या व्यक्तीच्या सर्व ॲसेट्सची वासलात करण्यात यावी.

### ३.९ तपासणी व जप्त करण्याचे अधिकार

ह्या अधिनियमातील तरतुदींचे उल्लंघन झाले आहे काय ह्याची पडताळणी करण्यासाठी, लेखा किंवा रेकॉर्ड्सची तपासणी करण्याचा अधिकार, ह्या अधिनियमाने केंद्र सरकारला दिला आहे. लेखा व रेकॉर्ड्स तसेच ह्या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन करुन मिळालेल्या वस्तु किंवा चलन प्रतिभूती जप्त करण्याचा अधिकारही ह्या अधिनियमाने दिलेला आहे.

### ३.१० संकीर्ण प्रश्न

ह्या अधिनियमाच्या तरतुदींचे उल्लंघन केले जाण्याबाबतचे काही गुन्हे व त्याबाबतची शिक्षा/दंड ह्या अधिनियमात दिले आहे. ह्या अधिनियमाच्या कलम ३७ अनुसार, ज्याच्यासाठी कोणताही दंड विहित केलेला नाही असे, ह्या अधिनियमाच्या तरतुदीचे उल्लंघन करणा-या कोणत्याही व्यक्तीला एक वर्ष पर्यंतचा कारावासाची शिक्षा किंवा दंड किंवा दोन्हीही केली जाऊ शकते.

ह्या अधिनियमातील तरतुदीनुसार, ह्या अधिनियमाखाली दंडनीय असलेल्या गुन्ह्याच्या बाबत (मग तो एखाद्या व्यक्तीने केला असो किंवा एखाद्या संघाने किंवा त्याच्या अधिका-याने किंवा कर्मचा-याने केलेला असो) व केवळ कारावासाचीच शिक्षा पुरेशी नसलेल्या गुन्ह्याच्या बाबतीत, फिर्याद करण्यापूर्वी, केंद्र सरकारने अधिकृत राजपत्रात दिलेल्या अधिसूचनेनुसार दिलेल्या रकमांसाठी, विहित केलेल्या अधिका-यांकडून किंवा प्राधिकरणांकडून कंपाऊंडिंग केले जाऊ शकते.

ह्या अधिनियमांच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी, केंद्र सरकार त्याला योग्य वाटेल अशा प्राधिकरणाला किंवा व्यक्तीला किंवा व्यक्ती-वर्गाला, त्याला योग्य वाटतील असे निदेश देऊ शकते.

**(४) ह्या अधिनियमाखाली तयार केलेले नियम व बँकांद्वारे अहवाल पाठविणे**

**(४.१)** ह्या अधिनियमाच्या कलम ४८ ने दिलेल्या अधिकारांचा वापर करुन, केंद्र सरकारने, ह्या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करण्यासाठी फॉरिन कॅांट्रिब्युशन (रेग्युलेशन) नियम, २०११ तयार केले आहेत. इतर बाबीं बरोबर, ह्या नियमांमध्ये, एखादी संस्था राजकीय स्वरुपाची आहे काय, कोणत्या कार्यकृती सट्टासदृश आहेत, प्रशासकीय खर्च म्हणजे काय, विशिष्ट वर्गातील व्यक्तींनी विदेशी पाहुणचार घेण्याबाबतची कार्यरीत, विदेशी वर्गणी स्वीकारण्यासाठी पंजीकरण किंवा पूर्व परवानगी मिळविण्यासाठी करावयाच्या अर्जाबाबतची कार्यरीत, कंपाऊंडिंगसाठी कोणाकडे अर्ज करावा, पंजीकृत किंवा अपंजीकृत अशा इतर व्यक्तींना विदेशी वर्गणी हस्तांतरित करण्याची कार्यरीत, निरनिराळ्या हेतूंसाठी भरावयाचे फॉर्म्स इत्यादींबाबत केंद्र सरकारसाठी मार्गदर्शक तत्वे दिली आहेत.

**(४.२)** ह्या नियमांमधील नियम १३ अनुसार वैधानिक करण्यात आले आहे की, पंजीकरण प्रमाणपत्र किंवा पूर्व-परवानगी मिळाली असलेल्या एखाद्या व्यक्तीला, एका वित्तीय वर्षात रु. एक कोटीपेक्षा अधिक विदेशी वर्गणी मिळाली असल्यास, त्याने/तिने, त्या विशिष्ट वर्षात व त्यानंतरच्या वर्षासाठीही, मिळालेली विदेशी वर्गणी व तिचा विनियोग ह्याबाबतची माहिती सारांशरुपाने सार्वजनिक केली पाहिजे.

**(४.३)** येथे नोंद घेणे महत्वाचे आहे की, नियम १५ अनुसार, ज्याचे पंजीकरण प्रमाणपत्र रद्द झाले आहे अशा व्यक्तीच्या, खास अशा विदेशी वर्गणी बँक खात्यात, त्या विदेशी वर्गणीची न वापरलेली रक्कम पडून असल्यास, त्या व्यक्तीने, केंद्र सरकार त्याबाबत पुढील सूचना देईपर्यंत, ती रक्कम, बँक-प्राधिकरणाकडे ठेवावी. पंजीकरण प्रमाणपत्र रद्द झालेल्या व्यक्तीने, विदेशी वर्गणी, दुस-या कोणत्याही व्यक्तीकडे हस्तांतरित केली असल्यास/केल्यास, जिला अशी रक्कम हस्तांतरित केली आहे, त्या व्यक्तीला ही अट लागु होईल.

**(४.४)** ह्या नियमांमधील नियम १६ अनुसार, पंजीकरण प्रमाणपत्र किंवा पूर्व-परवानगी घेणे आवश्यक आहे. परंतु त्या व्यक्तीला वर्गणी मिळतेवेळी असे प्रमाणपत्र किंवा पूर्व परवानगी देण्यात आली नाही अशा व्यक्तींच्या बाबतीत, केलेल्या कोणत्याही व्यवहाराच्या तारखेपासून ३० दिवसांच्या आत, प्रत्येक बँकेने केंद्र सरकारला त्याबाबतचा अहवाल पाठविणे आवश्यक आहे. अशा अहवालात पुढील माहिती दिली जावी

(अ) दात्याचे नाव व पत्ता<br>
(ब) स्वीकारणा-याचे नाव व पत्ता<br>
(क) खाते क्रमांक<br>
(ड) बँकेचे व बँक शाखेचे नाव<br>
(ई) विदेशी वर्गणीची रक्कम (विदेशी चलन तसेच भारतीय रुपयांमध्ये)<br>
(फ) मिळाल्याची तारीख<br>
(ग) विदेशी मुद्रा मिळण्याची रीत (रोख/चेक/इलेक्ट्रॉनिक ट्रान्स्फर इत्यादि).

**(४.५)** संबंधित बँकेचे हे कर्तव्यच ठरविण्यात आले आहे की, कोणत्याही व्यक्तीने, मग ती व्यक्ती ह्या अधिनियमाखाली पंजीकृत झालेली असो किंवा नसो. केवळ एकाच व्यवहारात किंवा तीस दिवसांच्या कालावधीमध्ये केलेल्या व्यवहारांमध्ये रुपये एक कोटी किंवा त्याच्या सममूल्य एखादी विदेशी वर्गणी मिळविली असल्यास, शेवटच्या व्यवहाराच्या तारखेपासून तीस दिवसांच्या आत, त्या बँकेने त्याबाबतचा अहवाल केंद्र सरकारकडे पाठवावा आणि अशा अहवालात वर उल्लेखिलेली माहिती समाविष्ट असावी.

**जोडपत्र १**

**ह्या महापरिपत्रकात एकत्रित केलेल्या, एफसीआरए, २०१० वरील परिपत्रकांची यादी**

| अनुक्रमांक | परिपत्रक क्रमांक व दिनांक | विषय | सूचनांचा सारांश |
|---|---|---|---|
| १ | डीबीओडी.एएमएल.बीसी.क्र.८०/१४.०८.००१/२०११-२०१२, दिनांक, ०६, फेब्रुवारी २०१२ | बी आर अधिनियम, १९४९ च्या कलम ३६(१)(अ) खाली दिलेली मार्गदर्शक तत्वे एफसीआरए, २०१० च्या तरतुदींची अंमलबजावणी | एफआरआरए, २०१० व एफसीआर, २०११ चे महत्वाचे गुणविशेष आणि ह्या अधिनियमाखाली बँकांची दायित्वे. |